नि.फौ.ख.क्र.१८/२०२४

सरकार -वि- गणराज, **नि.क्र.२०**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – राधेश्याम केशवराव वंजारी

वय. ३१ वर्षे, व्यवसाय – शेती,

निवासस्थान – सालई बु., ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील यांच्या मार्फत</u>**

घटना सन २०२३ मध्ये घडली होती. तारीख माझ्या लक्षात नाही. सदर घटना ही माझ्या शेतीच्या बाजुला असलेल्या पडीत जागेत सालई बु. येथे घडली होती. त्यावेळी संध्याकाळचे ५.०० वाजले असतील. त्यावेळी मी माझ्या शेतातील धान कापण्यासाठी बांध्यावरच काम करत होतो.

२. त्यादिवशी आमची गाय आरोपीच्या झोपडीमध्ये गेली होती. त्यावर आरोपी गणराज याने झोपडीमध्ये गाय आली म्हणुन माझ्या भावाला काठीने मारहाण केली. माझ्या भावाचे नांव तुळसीदास वंजारी असे आहे. त्यानंतर दुस–या दिवशी संध्याकाळच्या वेळी माझी आई आरोपी गणराज याला म्हणाली की, माझ्या पोराला कां मारले. त्यावर त्याने लोखंडी सळईने माझ्या आईला मारहाण केली. त्यावेळी मी शेतातच होतो. त्यानंतर मी माझ्या आईला घेवुन पहिल्यांना पोलिस ठाणे, तुमसर येथे आलो. त्यांनी आम्हाला सरकारी दवाखान्यात उपचाराकामी पाठविले. त्याठिकाणी माझ्या आईला जखमेवर टाके देण्यात आले. त्यानंतर माझ्या आईने तक्रार दाखल केली. मी आरोपींना ओळखु शकतो. ते आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. उपाध्याय यांच्यामार्फत</u> –**

३. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे एक गाय आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची गाय आरोपीच्या झोपडीत जात होती. हे म्हणणे खरे नाही की, तिने मारहाण केल्यामुळे म्हशीचे पिल्लु मेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गणराज याने आम्हाला त्याबाबत

माहिती दिली असता आम्ही त्याच्यासोबत झगडा भांडण करू लागलो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दोघेही भावांनी त्याच्यासोबत झगडा भांडण केले होते. पोलिसांना दिलेल्या जबाबात घटनेच्या आदल्यादिवशी आरोपी गणराज याने माझ्या भावाला काठीने मारहाण केली होती ही बाब पोलिसांना सांगितली होती. माझ्या आईला मारहाण झाली त्यावेळी मी शेतातच होतो ही बाब मी पोलिसांना बयाण देतेवेळी सांगितली होती. आता मला माझे बयाण दाखविण्यात आले. त्यामध्ये त्या बाबी नमुद नाही. त्या का नमुद नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई आरोपी गणराज सोबत झगडा भांडण करण्यास गेली असता ओबडधोबड जागेवर स्वत:हुन पडुन तिला जखम झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गणराज याने आमच्याविरूध्द फिर्याद दाखल केली आहे. त्याचप्रमाणे आम्ही सुध्दा त्याचेविरूध्द फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आईच्या सांगण्यावरून आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २४.०३.२०२६ | दि. २४.०३.२०२६ |